वाचले :- शासन निर्णय महसूल व वनविभाग, क्रमांक:- एससीवाय-2018/प्र.क्र. 216/म-7 दिनांक:- 21 फेब्रुवारी, 2019

आदेश :-

क्र.2019/टंचाई/कावि/११ /2019
जिल्हाधिकारी,कार्यालय,नंदुरबार
दिनांक:-25/02/2019

ज्या अर्थी उपोदघातील शासन निर्णय अन्वये, राज्यातील इतर तालुक्यातील महसुली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर 2018 या कालावधीत एकुण पर्जन्यमान 750 मि.मि.पेक्षा कमी झालेल्या महसुली मंडळातील 50 पैशांपक्षा कमी पैसेवारी आलेल्या राज्यातील एकुण 931 गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करुन खालील 8 उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.या व्यतीरिक्त परिशिष्ट-अ येथे नमूद केलेल्या सन 2018 च्या खरीप हंगामातील अंतीम पैसेवारी 50 पैशांपेक्षा कमी असलेल्या व अदयापही दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित न केलेल्या राज्यातील विविध जिल्हयातील एकुण 4518 गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित न केलेल्या त्याच्यापैकी नंदुरबार जिल्हयातील एकुण 195 गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करुन खालील सवलती लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

त्या अर्थी, मी **बालाजी मंजुळे जिल्हाधिकारी, नंदुरबार** अक्राणी व अक्कलकुवा तालुक्यामधील खालील महसुली मंडळातील गांवामध्ये अंतीम पैसेवारी 50 पैशांपेक्षा कमी असलेल्या परिशिष्ट- "अ" येथे नमूद केलेल्या दुष्काळ घोषित करुन खालील सवलती लागू करण्यास मंजूरी देत आहे.

परिशिष्ट - "अ"

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | महसूल मंडळ | एकुण गावे |
|---|---|---|---|---|
| 1 | नंदुरबार | अक्कलकुवा | डाब | 96 |
| 2 | | | वडफळी | |
| 3 | | | मोलगी | |
| 4 | | अक्राणी | संपूर्ण तालुका | 99 |
| | एकुण | | | 195 |

खालील प्रमाणे अनुज्ञेय सवलती उपलब्ध करुन देणे बाबत संबंधित विभागांना याव्दारे आदेशीत करीत आहे.

**1) जमीन महसूलात सूट.**

**2) सहकारी कर्जाचे पुनर्गठन**

**3) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.**

**4) कृषी पंपाच्या चालू विजबिलात 33.5% सूट.**

**5) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.**

**6) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.**

**7) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टॅंकर्सचा वापर.**

**8) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.**

( बालाजी मंजुळे)
**जिल्हाधिकारी, नंदुरबार**

प्रत:- मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नंदुरबार
प्रत:- जिल्हा अधिक्षक,कृषी अधिकारी,नंदुरबार
प्रत:- जिल्हा अग्रणी बॅंक नंदुरबार
प्रत:- जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,नंदुरबार
प्रत:- अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.नंदुरबार
प्रत:- शिक्षणधिकारी,प्राथमिक/माध्यमिक जि.प.नंदुरबार
प्रत:- उपजिल्हाधिकारी रो.ह.यो. जि.का.नंदुरबार
प्रत- सहाय्यक जिल्हाधिकारी तळोदा भाग तळोदा/उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा
प्रत:- तहसिलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार
प्रत:- तहसिलदार अक्कलकुवा अक्राणी यांचेकडेस योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- चेअरमन,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक,धुळे
प्रत:- गट विकास अधिकारी,अक्कलकुवा अक्राणी यांचेकडेस योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी नंदुरबार यांना जिल्हा संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेकामी रवाना.
प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी ,नंदुरबार यांना प्रसिध्दी करणेकामी रवाना.

(अनिल न.पवार)
**निवासी उपजिल्हाधिकारी,नंदुरबार**
**जिल्हाधिकारी नंदुरबार,करीता**